# उद्देशपूर्ण अर्थसंकल्प -अक्षत खेतान

**मुंबई :** आज सादर करण्यात आलेला केंद्रीय अर्थसंकल्प विकसित भारत घडवण्याच्या दिशेने सरकारची ठाम आणि स्पष्ट भूमिका दर्शवतो. सातत्यपूर्ण, अनुकूलनक्षम आणि भविष्यमुखी संरचनात्मक सुधारणांवर आधारित हा अर्थसंकल्प भारताच्या ७% विकासदराला गती देतो. विकसित भारत संवाद आणि युवा शक्तीवर आधारित दृष्टिकोन यावर आधारित हा अर्थसंकल्प तीन प्रमुख कर्तव्यांवर उभा आहेआर्थिक विकासाला गती देणे व टिकवून ठेवणे आणि सबका साथ, सबका विकास या दृष्टीकोनाशी सुसंगत समावेशक विकास साधणे. कॉर्पोरेट ॲडव्हायझरी अँड लीगल सर्व्हिसेस, संस्थापक-अक्षत खेतान म्हणाले. या अर्थसंकल्पाची मोठी ताकद म्हणजे सतत विकसित होणाऱ्या संरचनात्मक सुधारणांवर दिलेला भर. विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा फोर्स मल्टिप्लायर म्हणून वापर, तसेच केंद्रराज्य पातळीवरील नियमन शिथिलीकरणाचे प्रयत्न सरकारचा आधुनिक व व्यवहार्य धोरणात्मक दृष्टिकोन अधोरेखित करतात. उत्पादन व औद्योगिक क्षेत्रात मांडलेले धोरणात्मक हस्तक्षेप चॅम्पियन  घडवणे, दीर्घकालीन स्थैर्य निर्माण करणे, पायाभूत सुविधा बळकट करणे आणि भविष्यातील विकासासाठी शहरांचे इकोसिस्टम विकसित करण्यावर केंद्रित आहेत.